<u>प्रतिनियुक्तीने नियुक्ती</u>

श्री. प्रभोदय मुळे, उप जिल्हाधिकारी यांची उपसंचालक, प्रादेशिक पर्यटन संचालनालय, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्र. टिआरएफ-०७२४/प्र.क्र.१९१/भाग-३/ई-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २२ ऑगस्ट, २०२४

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५

२) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०२१/ प्र.क्र.४९/कार्या-१२, दि.१४.०७.२०२१

शासन आदेश:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४), ४ (५) व महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढूण टाकणे) नियम, १९८१ च्या नियम-४० मधील परिशिष्ट-२ मधील विहित अटी व शर्तीना अधीन राहून तसेच, दिनांक ०३.०८.२०२४ रोजीच्या आदेशात अंशत: बदल करुन **श्री. प्रभोदय मुळे, उप जिल्हाधिकारी** यांची **उपसंचालक, प्रादेशिक पर्यटन संचालनालय, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर** या पदावर **३ वर्षांच्या कालावधीसाठी** सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने **प्रतिनियुक्तीने नियुक्ती** करण्यात येत आहे.

२. श्री. प्रभोदय मुळे, उप जिल्हाधिकारी यांनी प्रतिनियुक्तीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर रुजू होण्यासाठी पुढील सूचनांसाठी सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे हजर व्हावे.

३. **उपसंचालक, प्रादेशिक पर्यटन संचालनालय, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर** या पदावरील प्रतिनियुक्तीच्या अनुषंगाने श्री. प्रभोदय मुळे, उप जिल्हाधिकारी यांच्या सेवा सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८२२२१४२५०३९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VARUDKAR MAHESH ASHOKRAO

Digitally signed by VARUDKAR MAHESH ASHOKRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department, 2.5.4.20=d93c4961d98086877a4048296211d7af97ecfd40d7967c43d20b360d83ce0fa6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7ebbbc3712e8d459ef90bf7aae4ea46e9caebdd50cfecde2ee7ce0454fa0416a, cn=VARUDKAR MAHESH ASHOKRAO
Date: 2024.08.22 22:09:14 +05'30'

(महेश वरुडकर)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. संबंधित जिल्हाधिकारी.
७. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९. संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
१०.संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
११.संबंधित उप जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत).
१२.उप सचिव (ई-२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१३.निवडनस्ती (ई-२).